338/5113

पावती

Tuesday,April 16 ,2019
12:59 PM

Original/Duplicate
नोंदणी क्रं. :39म
Regn.:39M

पावती क्रं.: 5670 दिनांक: 16/04/2019

गावाचे नाव: टिटवाळा
दस्तऐवजाचा अनुक्रमांक: कलन4-5113-2019
दस्तऐवजाचा प्रकार : विकसनकरारनामा
सादर करणाऱ्याचे नाव: मे. साई गणेश एंटरप्रायझेस तर्फे भागीदार श्री. मिलिंद जगन्नाथ वाळेकर

| | |
|---|---|
| नोंदणी फी | रु. 30000.00 |
| दस्त हाताळणी फी | रु. 540.00 |
| पृष्ठांची संख्या: 27 | |
| एकूण: | रु. 30540.00 |

आपणास मूळ दस्त ,थंबनेल प्रिंट,सूची-२ अंदाजे
1:25 PM ह्या वेळेस मिळेल.

Joint Sub Registrar Kalyan 4
सह-दुय्यम निबंधक कल्याण ४

बाजार मुल्य: रु.1766500 /-
मोबदला रु.5766500/-
भरलेले मुद्रांक शुल्क : रु. 288400/-

1) देयकाचा प्रकार: eChallan रक्कम: रु.30000/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: MH000442543201920E दिनांक: 12/04/2019
बँकेचे नाव व पत्ता:
2) देयकाचा प्रकार: DHC रक्कम: रु.540/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: 1504201912576 दिनांक: 15/04/2019
बँकेचे नाव व पत्ता:

मूल्यांकन पत्रक (शहरी क्षेत्र खुली जमीन)

Valuation ID : 20190416558

16 April 2019 10:34:16 AM

| | |
|---|---|
| मूल्यांकनाचे वर्ष | 2019 |
| जिल्हा | ठाणे |
| तालुका | तालुका : कल्याण गावाचे नाव : टिटवाळा (कल्याण डोंबिवली महानगरपालिका) |
| उपमूल्य विभाग | 23/77-विभाग 1 टिटवाळा (33) टिटवाळा गावातील सर्व मिळकती |
| क्षेत्राचे नाव | Kalyan/Dombival Muncipal Corporation |

कलन - ४
दस्त क्र. ५७५३ /१९
९/२५

वार्षिक मुल्य दर तक्त्यानुसार जमिनीचा दर

| खुली जमीन | निवासी सदनिका | कार्यालय | दुकाने | औद्योगीक | मोजमापनाचे एकक |
|---|---|---|---|---|---|
| 9200 | 38300 | 44300 | 54000 | 44300 | चौ मीटर |

मिळकतीचे क्षेत्र 312 चौ मीटर Bulk Land

1. 312चौ मीटर क्षेत्रासाठी वार्षिक मूल्य दरावर 100 % मूल्य दर =9200/-

312चौ मीटर क्षेत्रासाठी मुल्यांकन = 312*9200

=2870400/-

जमीनीचे एकत्रित अंतिम मुल्य = मिळकतीचे क्षेत्र 1 मूल्य + मिळकतीचे क्षेत्र 2 मूल्य

=2870400 + 0

= Rs.2870400/-

Home Print

विकास करार

क्षेत्र - ३९२ चौ मी
- १९८ चौ मी · जमिन मालक
बांधकाम. मोबदला

क्षेत्र : १०४ चौ मी - विकासक
= १०४ x ९२०० = ९५६८००/-
टि डी आर
क्षेत्र ३९२ x ९२०० x २५% = ७१७६००/-
१७६६४००/-

जमीन · मालक बांधकाम · मोबदला
क्षेत्र · १९८ x २४२०० x १.१ = ५२७०२००/-
परतावा
रु. १५०००००/- x १% x ३ = ४५०००/-
विकास कर
क्षेत्र · १९८ x ९२०० x २.५% = ४५६००/-
५७६६४००/-
= ५७६६५००/-

m.v - 1766400/-
A.V - 5766500/-
S.d - 288400/-

THE SEAL OF THE JOINT SUB REGISTRAR KALYAN-4
सह दुय्यम निबंधक कल्याण-४ यांची मुद्रा
जि. ठाणे
Dist. Thane

कलन - ४
दस्त क्र. ५३३३ /१९
२/२५

**CHALLAN**
**MTR Form Number-6**

| GRN | MH004425432019920E | BARCODE | | Date | 12/04/2019-16:37:58 | Form ID | 25.2 |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| **Department** Inspector General Of Registration | | **Payer Details** | |
| **Type of Payment** Stamp Duty Registration Fee | | **TAX ID (If Any)** | |
| | | **PAN No.(If Applicable)** | ACGFS5266E |
| **Office Name** KLN3_KALYAN NO 3 JOINT SUB REGISTRA | | **Full Name** | SAI GANESH ENTERPRISES |
| **Location** THANE | | | |
| **Year** 2019-2020 One Time | | **Flat/Block No.** | S.NO.353, VILLAGE TITWALA, |
| **Account Head Details** | **Amount In Rs.** | **Premises/Building** | |
| 0030046401 Stamp Duty | 288400.00 | **Road/Street** | TAL. KALYAN, DIST. THANE, |
| 0030063301 Registration Fee | 30000.00 | **Area/Locality** | TITWALA |
| | | **Town/City/District** | |
| | | **PIN** | 4 2 1 6 0 5 |
| | | **Remarks (If Any)** | |
| | | PAN2=AEFPL4923E~SecondPartyName=ROHINI P | |
| DEFACED | | LELE~CA=5766500~Marketval=1766500 | |
| ₹318400.00 | | | |
| DEFACED | | **Amount In** | Three Lakh Eighteen Thousand Four Hundred Rupees O |
| Total | 3,18,400.00 | **Words** | nly |

| **Payment Details** IDBI BANK | | **FOR USE IN RECEIVING BANK** | | |
|---|---|---|---|---|
| **Cheque-DD Details** | | Bank CIN | Ref. No. | 69103332019041214718 210774946 |
| Cheque/DD No. | | Bank Date | RBI Date | 12/04/2019-16:39:15 15/04/2019 |
| Name of Bank | | Bank-Branch | | IDBI BANK |
| Name of Branch | | Scroll No. , Date | | 100 , 15/04/2019 |

Department ID : Mobile No. : 9769825991

NOTE:- This challan is valid for document to be registered in Sub Registrar office only. Not valid for unregistered document.
सदर चलन केवळ दुय्यम निबंधक कार्यालयात नोदंणी करावयाच्या दस्तांसाठी लागु आहे. नोदंणी न करावयाच्या दस्तांसाठी सदर चलन लागु नाही.

Validity unknown
Digitally signed by DS VIRTUAL TREASURY MUMBAI 02
Date: 2019.04.16 13:03:26 IST
Reason: Secure Document
Location: India

THE SEAL OF THE SUB REGISTRAR KALYAN-3 सह दुय्यम निबंधक कल्याण-३ जि. ठाणे Dist. Thane

**Challan Defaced Details**

| Sr. No. | Remarks | Defacement No. | Defacement Date | UserId | Defacement Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | (iS)-338-5113 | 0000307013201920 | 16/04/2019-12:59:44 | IGR127 | 30000.00 |
| 2 | (iS)-338-5113 | 0000307013201920 | 16/04/2019-12:59:44 | IGR127 | 288400.00 |
| | | | **Total Defacement Amount** | | 3,18,400.00 |

| क ल न - ४ |
|---|
| दस्त क्र. ५००३ /१९ |
| ३/ २१० |

**Document Handling Cha₹ges**
Inspector General of Registration & Stamps

## Receipt of Document Handling Charges

| PRN | 1504201912576 | Receipt Date | 16/04/2019 |
|---|---|---|---|

Received from Joint SR Kalyan, Mobile number 9821314004, an amount of Rs.540/-, towards Document Handling Charges for the Document to be registered on Document No. 5113 dated 16/04/2019 at the Sub Registrar office Joint S.R.Kalyan 4 of the District Thane.

DEFACED
₹ 540
DEFACED

## Payment Details

| | | | |
|---|---|---|---|
| Bank Name | IBKL | Payment Date | 15/04/2019 |
| Bank CIN | 10004152019041510670 | REF No. | 211118900 |
| Deface No | 1504201912576D | Deface Date | 16/04/2019 |

This is computer generated receipt, hence no signature is required.

THE SEAL OF THE JOINT SUB REGISTRAR KALYAN-4
सह दुय्यम निबंधक कल्याण-४ यांची मुद्रा
जि. ठाणे
Dist. Thane

| कलन - ४ |
|---|
| दस्त क्र. ५११३ /१९ |
| ०१/२० |

## Department of Stamp & Registration, Maharashtra

### Receipt of Document Handling Charges

| PRN | 1504201912576 | Date | 15/04/2019 |
|---|---|---|---|

Received from Joint SR Kalyan, Mobile number 9821314004, an amount of Rs.540/-, towards Document Handling Charges for the Document to be registered(iSARITA) in the Sub Registrar office Joint S.R.Kalyan 4 of the District Thane.

**Payment Details**

| | | | |
|---|---|---|---|
| **Bank Name** | IBKL | Date | 15/04/2019 |
| **Bank CIN** | 10004152019041510670 | REF No. | 211118900 |

This is computer generated receipt, hence no signature is required.

THE SEAL OF THE JOINT SUB REGISTRAR KALYAN-4
सह दुय्यम निबंधक कल्याण-४ यांची मुद्रा
जि. ठाणे
Dist. Thane

CHALLAN

MTR Form Number-6

| | | | |
|---|---|---|---|
| RN MH000442543201920E | BARCODE | Date 12/04/2019-16:37:58 | Form ID 25.2 |

| | | | |
|---|---|---|---|
| epartment | Inspector General Of Registration | Payer Details | |
| | Stamp Duty | TAX ID (If Any) | |
| ype of Payment | Registration Fee | PAN No.(If Applicable) | ACGFS5266E |
| ffice Name | KLN3_KALYAN NO 3 JOINT SUB REGISTRA | Full Name | SAI GANESH ENTERPRISES |
| ocation | THANE | | |
| ear | 2019-2020 One Time | Flat/Block No. | S.NO.353, VILLAGE TITWALA, |

| Account Head Details | Amount In Rs. | | |
|---|---|---|---|
| | | Premises/Building | |
| 30046401 Stamp Duty | 288400.00 | Road/Street | TAL. KALYAN, DIST. THANE, |
| 30063301 Registration Fee | 30000.00 | Area/Locality | TITWALA |
| | | Town/City/District | |
| | | PIN | 4 2 1 6 0 5 |
| | | Remarks (If Any) | |
| | | PAN2=AEFPL4923E~SecondPartyName=ROHINI P | |
| | | LELE~CA=5766500~Marketval=1766500 | |
| | | Amount In Words | Three Lakh Eighteen Thousand Four Hundred Rupees Only |
| otal | 3,18,400.00 | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ayment Details | IDBI BANK | FOR USE IN RECEIVING BANK | | |
| Cheque-DD Details | | Bank CIN | Ref. No. | 69103332019041214718 210774946 |
| eque/DD No. | | Bank Date | RBI Date | 12/04/2019-16:39:15 Not Verified with RBI |
| ame of Bank | | Bank-Branch | | IDBI BANK |
| ame of Branch | | Scroll No. , Date | | Not Verified with Scroll |

Mobile No. : 9769825991

epartment ID :

OTE:- This challan is valid for document to be registered in Sub Registrar office only. Not valid for unregistered document.

दर चलन केवल दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी करावयाच्या दस्तांसाठी लागु आहे. नोंदणी न करावयाच्या दस्तांसाठी सदर चलन लागु ही.

कलन - ४

दस्त क्र. ५११३ /१९

५/२५

Page 1/1

Print Date 12-04-2019 04:40:55

THE SEAL OF THE JOINT SUB REGISTRAR KALYAN-3 सह दुय्यम निबंधक कल्याण-३ ठाणे जि. ठाणे Dist. Thane

क ल न – ४
दस्त क्र. ५७७३ /१९
७/२५

# विकास करार

स्थावर मिळकतीचा विकास करार आज दि.१६/०४/२०१९ रोजी डोंबिवली येथे खालील पक्षकारामध्ये लिहून ठेवला व येणेप्रमाणे.

(१) **सौ. रोहिणी प्रकाश लेले**, वय ६४ वर्ष, व्यवसाय गृहीणी, **PAN-AEFPL4923E**, (२) **श्री. प्रकाश गोविंद लेले**, वय ७२ वर्ष, व्यवसाय निवृत्त, **PAN-AAJPL7632A**, दोघेही राहणार २०४, मृण्मयी सोसा., सिद्धेश्वर लेन, परनाका, अपेक्स हॉस्पीटल जवळ, कल्याण (पश्चिम)-४२१३०१, (३) **सौ. रश्मी अमोद गोरे (पूर्वाश्रमीची रश्मी प्रकाश लेले)**, वय ३८ वर्ष, व्यवसाय नोकरी, **PAN- ALHPG5234G** राहणार ६०३, ओरकीड बिल्डिंग नं.६, हाईलॅन्ड रेसिडेन्सी, कोलशेत रोड, ढोकाळी, ठाणे ज्यांना यापुढे सोईसाठी **"लिहून देणार/मिळकत मालक"** असे संबोधण्यात आले आहे (ज्या संज्ञेत त्यांचे सर्व वालीवारस, कुळवहिवाटदार, हिस्सेदार, मुखत्यार व मृत्यूपत्र व्यवस्थापक यांचा समावेश होईल);

आणि

**मे. साई गणेश एंटरप्रायझेस**, भागीदारी संस्था, **PAN-ACGFS5266E**, पत्ता ए/९, बाळकृष्ण अपार्टमेंट, घनश्याम गुप्ते रोड, डोंबिवली (प)-४२१२०२, तर्फे भागीदार (१) **श्री. मिलिंद जगन्नाथ वाळेकर**, वय ५४ वर्ष, व्यवसाय धंदा, (२) **श्री. सुरेश शांताराम म्हात्रे**, वय ५३ वर्ष, व्यवसाय धंदा, (३) **श्री. भावेश जयंतीलाल पटेल**, वय ३६ वर्ष, व्यवसाय धंदा, ज्यांना यापुढे सोईसाठी **"लिहून घेणार/विकासक"** असे संबोधण्यात आले आहे (ज्या संज्ञेत त्यांचे सर्व वालीवारस, हिस्सेदार, मुखत्यार व मृत्युपत्र व्यवस्थापक यांचा समावेश होईल);

**ज्याअर्थी** तुकडी जिल्हा ठाणे, पोटतुकडी तालुका कल्याण, येथील कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील, तसेच दुय्यम निबंधक कल्याण यांचे स्थळसिमेतील, **मौजे टिटवाळा, स.नं.३५३ [जुना स.नं.१८७/१/ते ६ + ८८७/१/१ पै. प्लॉट नं.८५], क्षेत्र ३१२ चौ.मी.**, व खालील **"मिळकतीचे परिशिष्ट"** मध्ये जिचे विस्तृत वर्णन केले आहे, अशी मिळकत, ह्यातील मिळकत मालक यांच्या मालकीची व कब्जेवहीवाटीची आहे (जिला येथुन पुढे **"सदर मिळकत"** असे संबोधले आहे);

**आणि ज्याअर्थी** मिळकत मालक यांचा सदर मिळकत योग्य अशा विकासकास विकसीत करण्यास देण्याचा मानस होता;

कलन - ४
दस्त क्र. ५००३ /१९
८/२५

आणि ज्याअर्थी मिळकत मालक यांचा मानस विकासक यांना समजल्यावरून विकासक यांनी मिळकत मालक यांची भेट घेऊन सदर मिळकत विकसीत करण्यास घेण्याचा प्रस्ताव ठेवला;

आणि ज्याअर्थी उभय पक्षकारांमध्ये बैठक व वाटाघाटी होऊन मिळकत मालक यांनी विकासक यांचा प्रस्ताव स्विकारला व सदर मिळकत ह्यातील विकासक यांना विकसीत करण्यास देण्याचे ठरवले;

त्याअर्थी सदर मिळकत विकसीत करण्याबाबत उभय पक्षकारांमध्ये ठरलेल्या सर्व अटी व शर्ती येणेप्रमाणे: -

१. तुकडी जिल्हा ठाणे, पोटतुकडी तालुका कल्याण, येथील कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील, तसेच दुय्यम निबंधक कल्याण यांचे स्थळसिमेतील, **मौजे टिटवाळा, स.नं.३५३ [जुना स.नं.१८७/१ ते १० + १९०/११ पै, प्लॉट नं.८५], क्षेत्र ३१२ चौ.मी.**, व खालील **"मिळकतीचे परिशिष्ट"** मध्ये जिचे विस्तृत वर्णन केले आहे, अशी सदर मिळकत, ह्यातील मिळकत मालक यांनी विकासक यांना विकसीत करण्यास देण्याचे मान्य व कबूल केले आहे.

२. अ) उभय पक्षकारांमध्ये असे ठरले आहे की, सदर मिळकतीचे विकास हक्क व अधिकार विकासक यांचे लाभात तब्दील करण्याच्या मोबदल्यापोटी विकासक यांनी मिळकत मालक यांना एकत्रितपणे सदर मिळकतीवर बांधावयाच्या नियोजीत प्रकल्पामध्ये कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडून मूळ चटई क्षेत्र निर्देशांक व हस्तांतरणीय विकास हक्क समायोजित करुन मंजूर होणा-या एकूण बांधकाम क्षेत्रापैकी **१८६ चौ.मी. कार्पेट क्षेत्राचे निवासी बांधकाम** व १२ चौ.मी. **कार्पेट क्षेत्राचे वाणिज्य बांधकाम** असे एकूण **१९८ चौ.मी.** कार्पेट क्षेत्राचे बांधकाम विनामोबदला देण्याचे मान्य व कबूल केले आहे. तसेच वरउल्लेखीत वास्तूरुपी मोबदल्याव्यतिरिक्त विकासक यांनी मिळकत मालक यांना परतावा योग्य अनामत रक्कमपोटी **रु.१५,००,०००/-** (अक्षरी रुपये पंधरा लाख मात्र) देण्याचे मान्य व कबूल केले आहे. सदरहू परतावा योग्य अनामत रक्कम विकासक यांनी मिळकत मालक यांना खालीलप्रमाणे दिली आहे:

क ल न - ४
दस्त क्र. ५७७९ /१९
९/२५०

(१) ₹५,००,०००/- (अक्षरी रूपये पाच लाख रुपये मात्र) चेक नं.१०८८५६, दि.२६.०२.२०१९, डोंबिवली नागरी सहकारी बँक लि., आनंदनगर, डोंबिवली (प) शाखेद्वारे.

(२) ₹१०,००,०००/- (अक्षरी रूपये दहा लाख मात्र) चेक नं.१०८८७३, दि.१३.०४.२०१९, डोंबिवली नागरी सहकारी बँक लि., आनंदनगर, डोंबिवली (प) शाखेद्वारे.

ब) उभय पक्षकारांमध्ये असेही ठरले आहे की, वरील प्रमाणे मिळकत मालक यांना मोबदल्यापोटी मिळणा-या **१८६ चौ.मी. कार्पेट** क्षेत्राच्या निवासी बांधकाम नियोजित इमारतीच्या दूस-या, तिस-या व चौथ्या मजल्यावर पूढील व मागील बाजूस समप्रमाणात देण्याचे आहे. तसेच मिळकत मालक यांना मोबदल्यापोटी देय असलेल्या निवासी सदनिकांपैकी मिळकत मालक जी सदनिका स्वतःच्या निवासाकरीता ठेवतील, अशा सदनिकेबाबतचा डेव्हलपमेंट चार्ज मिळकत मालक यांनी देण्याचा नाही. मात्र सदर सदनिका मिळकत मालक यांचे नावे नोंदणी करून घेण्यासाठी होणारा इतर खर्च जसे की मुद्रांक शुल्क व नोंदणी फी, जी.एस.टी., हे मिळकत मालक यांनी विकासक यांना स्वतंत्रपणे देण्याचे आहे. सदरहू बाब मिळकत मालक यांना संपूर्णपणे मान्य व कबूल आहे व मिळकत मालक त्याबाबत भविष्यात कधीही कोणतीही हरकत अथवा वाद करणार नाहीत. तसेच सदरहू बांधकामाचे मिळकत मालक किंवा त्यांचे प्रतिनीधी यांचे नावे नोंदणी करून घेण्यासाठी होणारा सर्व खर्च जसे की मुद्रांक शुल्क व नोंदणी फी, जी.एस.टी., तसेच विज मीटर व पाणी कनेक्शन, सोसायटी फॉरमेशन तसेच डेव्हलपमेंट चार्जेस हे मिळकत मालक किंवा त्यांचे प्रतिनिधी यांनी विकासक यांना स्वतंत्रपणे देण्याचे आहे.

क) उभय पक्षकारांमध्ये असे स्पष्टपणे ठरले आहे की, वरउल्लेखीत परतावा योग्य अनामत रक्कमेवर कोणतेही व्याज आकारले जाणार नाही. व मिळकत मालक यांना मोबदल्यापोटी देय असलेल्या बांधकामाचा ताबा मिळकत मालक किंवा त्यांचे प्रतिनीधी यांना सुपुर्द करण्याबाबत विकासक यांनी लेखी कळविल्यावर त्वरित मिळकत मालक यांनी सदरहू परतावा योग्य अनामत रक्कम विकासक यांना विनव्याजी परतफेड करण्याची आहे. उभय पक्षकारांमध्ये असे स्पष्टपणे ठरले आहे की, मिळकत मालक यांनी सदरहू परतावा योग्य अनामत रक्कम विकासक यांना संपूर्ण परतफेड न केल्यास विकासक हे मिळकत मालक यांना देय

कलन - ४
दस्त क्र. ५११३ /१९
१० /२०

असलेल्या एकूण बांधकामापैकी बाजारभावाप्रमाणे सदर रकमेच्या प्रमाणात येणा-या क्षेत्राचे बांधकाम वजा करुन उर्वरीत बांधकाम मिळकत मालक यांना सुपुर्द करतील व ही बाब मिळकत मालक यांना मान्य व कबूल आहे.

३. विकासक यांनी सदर मिळकतीवर बांधावयाच्या नविन नियोजीत प्रकल्पाचे बांधकाम कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडून नियोजीत प्रकल्पास बांधकाम मंजूरी मिळाल्याच्या तारखेपासून **३० महिन्यात** पूर्ण करुन मिळकत मालक यांना मोबदल्यापोटी देय असलेल्या बांधकामाचा ताबा सुपुर्द करावयाचा आहे. परंतू जर सिमेंट, स्टील इतर बांधकाम सामग्री, विज, पाणी इत्यादीचा वेळच्या वेळी पुरवठा न मिळाल्यामुळे आणि/अथवा युध्द, नागरीक अशांती अथवा नैसर्गिक आपत्ती अथवा कोणत्याही सरकारी, निमसरकारी अथवा सक्षम प्राधिकरणाकडून विकासक यांची कोणतेही चुक नसताना कोणतीही नोटीस राज्यपत्र अथवा आदेश असल्यामुळे आणि/अथवा विकासक यांचे हाताबाहेरच्या अशा कोणत्याही एक किंवा अनेक कारणामुळे सदर नियोजित इमारतीचे बांधकामास उशीर अथवा दिरंगाई झाल्यास त्यासाठी विकासक यांस कोणत्याही प्रकारे जबाबदार धरले जाणार नाही. तसेच अशा परिस्थितीत वरीलप्रमाणे ठरलेल्या कालावधीत योग्य ती मुदत वाढ करुन मिळण्यास विकासक पात्र राहतील.

४. सदर मिळकत योग्य प्रकारे विकसीत करण्यासाठी तलाठी, तहसीलदार, प्रांत, जिल्हाधिकारी, महानगरपालिका अथवा सकृषम प्राधिकारी व इतर कोणत्याही सरकारी, निमसरकारी कार्यालयातून आवश्यक त्या परवानग्या व कागदपत्रे मिळवण्यासाठी सह्या, जाब-जबाब, प्रतिज्ञापत्र इत्यादी विनाविलंब देऊन मिळकत मालक यांनी विकासक यांना संपूर्ण सहकार्य करण्याचे आहे. सदरच्या परवानग्या व कागदपत्रे मिळवण्यासाठी येणारा खर्च मात्र विकासक यांनी करावयाचा आहे.

५. विकासक यांना सदर मिळकत विकसीत करणे सुलभ होण्यासाठी मिळकत मालक यांनी विकासक यांच्या लाभात सदर विकास कराराच्या अनुषंगाने कधीही रद्द न होणारे कुलमुखत्यारपत्र लिहून द्यावयाचे आहे व योग्य त्या दुय्यम निबंधक कार्यालयात हजर राहून ते नोंदणीकृत करून देण्याचे आहे. मात्र त्यासाठी येणारा सर्व खर्च विकासक यांनी सोसावयाचा आहे. तसेच उभय पक्षकारांमध्ये असे ठरले आहे की, सदर कुलमुखत्यारपत्राच्या अनुषंगाने विकासक

यांनी मिळकतीबाबत मिळकत मालक यांचे वतीने करावयाची सर्व कामे त्यांनी स्व:खर्चाच्या तसेच स्वत:च्या जोखीमेवर करावयाची आहेत व त्याची कोणतीही तोषीस मिळकत मालक यांना लागू देण्याची नाही.

६. प्रस्तूत करार नोंदणीकृत करण्याबरोबरच सदर मिळकत योग्यप्रकारे विकसीत करण्यासाठी मिळकत मालक यांनी विकासक यांना सदर मिळकतीचा लायसन्सी म्हणून ताबा देण्याचा आहे, व विकासक यांना त्यांचे प्रतिनिधी दलाल, नोकर, कामगार, आर्किटेक, सर्व्हेयर आणि/किंवा इतर व्यावसाईक यांचे समवेत सदर मिळकतीवर जाण्या-येण्याचा, स्वत:चा नावाचा बोर्ड, होर्डींग्स जाहिराती वैगैरे लावण्याचा, तसेच वीज, टेलिफोन कनेक्शनचे पोल उभारणे, वगैरेचा अधिकृत परवाना व परवानगी दिली आहे.

७. मिळकत मालक ह्याद्वारे असे जाहीर करतात की, सदर कराराच्या अनुषंगाने सदर मिळकतीचा लायसन्सी म्हणून ताबा विकासक यांना सुपुर्द करण्याच्या तारखेपर्यंत सदर मिळकतीबाबतचे सर्व कर, उपकर, सारा इत्यादी भरण्याची जबावदारी मिळकत मालक यांची राहील, मात्र सदर मिळकतीचा लायसन्सी म्हणून ताबा विकासक यांना सुपुर्द केल्याच्या तारखेनंतर पुढील सर्व कर, उपकर, सारा इत्यादी संबधीत खात्याला भरण्याची जबाबदारी विकासक यांची राहील.

८. मिळकत मालक असे घोषीत करतात की, त्यांनी सदर मिळकत या पुर्वी अन्य कोणासही गहाण, दान, बक्षिस, खरेदी अथवा विकास कराराने दिलेली नाही, अगर सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारे बोजा निर्माण केलेला नाही. तसेच मिळकत मालक यांनी अन्य कोणाशीही सदर मिळकतीबाबत कोणत्याही प्रकारचा लेखी किंवा तोंडी करार केलेला नाही. असा कोणताही वाद विवाद ह्या करारानंतर निर्माण झाल्यास किंवा कोणी सदर मिळकतीबाबत कोण्त्याही प्रकारे हक्क सांगितल्यास, त्याचे निवारण करण्याची खर्चासह संपूर्ण जबाबदारी मिळकत मालक यांची राहील व त्याची कोणतीही तोषीस त्यांनी विकासक यांना लागू द्यायची नाही. मिळकत मालक ह्याद्वारे असेही घोषीत करतात की, त्यांचे सदर मिळकतीबाबतचे टायटल चोख, निर्वेध व बोजाविरहीत आहे व सदर मिळकत विकासक यांना विकसीत करण्यास देण्याचा त्यांना संपूर्ण हक्क व अधिकार आहे.

कलन - ४
दस्त क्र. ५७७३ /१९
९३/२८

९. मिळकत मालक असेही जाहीर करतात की, त्यांना यापूर्वी सदर करारापर्यंत कोणत्याही सरकारी, निमसरकारी कार्यालयाकडून अथवा महानगरपालिका अथवा इतर सक्षम प्राधिकरणाकडून सदर मिळकत कोणत्याही सरकारी, निमसरकारी कामासाठी आरक्षीत करणे संबधीची नोटीस आलेली नाही.

१०. सदर मिळकत विकसीत करण्यासाठी विकासक यांनी स्व:खर्चाने स्वत:च्या नावाचा बोर्ड व नियोजीत विकास योजनेचे होर्डींग्ज लावण्याचा तसेच नियोजीत इमारतीत रहिवाशी/वाणिज्य अथवा इतर गाळे व युनिट्स विकण्यास उपलब्ध असल्याबाबत वृत्तपत्रात जाहिरात देण्याचा अधिकार राहील.

११. सदर मिळकतीलगत असलेले प्लॉट/जमीन विकासक यांना सदर मिळकतीमध्ये समाविष्ट करुन एकत्रितपणे विकसीत करावयाचे असल्यास त्यास मिळकत मालक यांची हरकत असणार नाही. सदर मिळकतीमध्ये आजूबाजूच्या जागा/प्लॉट समाविष्ट करून एकत्रिपणे विकसीत करून बांधकाम करण्याचा अधिकार विकासक यांना राहील. अशा प्रकारे लगतचे प्लॉट/जमीन समाविष्ट करून एकत्रीतपणे विकसीत केल्यामुळे विकासक यांना कोणत्याही प्रकारचा अतिरिक्त एफ.एस.आय. आणि/अथवा हस्तांतरणीय विकास हक्क उपलब्ध होत असल्यास तो सदर मिळकतीवर वापरण्याचा संपूर्ण हक्क व अधिकार फक्त विकासक यांचाच राहील व त्याबाबत कोणताही वाढीव मोबदला मागण्याचा अधिकार मिळकत मालक यांना राहणार नाही. तसेच आजूबाजूच्या मिळकती समाविष्ट करताना त्या मिळकतीत कोणत्याही हक्क मिळकत मालक यांनी सांगण्याचा नाही.

१२. सदर मिळकतीबाबत कल्याण डोंबिवली महानगरपालिका अथवा सक्षम प्राधिकारी यांचेकडे भरावी लागणारी फ़ी, डेव्हलपमेंट चार्जेस, ओपन लॅण्ड चार्जेस इ. विकासक यांनी भरावयाचे आहेत व त्याची पावती स्वीकारण्याची आहे. तसेच त्यांनी भरलेल्या कोणत्याही रकमेचा परतावा मिळावयाचा असल्यास तो विकासक यांनी स्वीकारण्याचा आहे व त्याची पावती देण्याची आहे. त्यास्त मिळकत मालक यांचा कोणताही हक्क व हितसंबधीत राहणार नाही.

THE OFFICE OF THE JOINT SUB REGISTRAR KALYAN Dist. Thane

१३. सदर मिळकतीत नियोजीत बांधकामासाठी लागणारे विज व पाणी कनेक्शन विकासक यांनी संबधीत खात्याकडून मिळविण्याचे आहे. त्यासाठी आवश्यक फ़ी डिपोझीट इत्यादी रक्कम विकासक यांनी भरण्याची आहे व मिळकत मालक यांनी

क ल न – ४
दस्त क्र. ५११३ /१९
१३ /२०

सदर गोष्टीसाठी आवश्यक त्या, सह्या, जाब-जबाब, प्रतिज्ञापत्र इत्यादी देऊन सहकार्य करण्याचे आहे.

१४. उभय पक्षकारांमध्ये असे ठरले आहे की, सदर मिळकतीवर उपलब्ध असलेला मूळ चटई क्षेत्र निर्देशांक, प्रिमीयम एफ.एस.आय., तसेच हस्तांतरणीय विकास हक्क विकत घेऊन सदर मिळकतीवर वापरण्याचा संपूर्ण हक्क व अधिकार फक्त विकासक यांचाच राहील व त्यापोटी मिळकत मालक यांना वर परिच्छेद नं.२ मध्ये नमूद मोबदल्याव्यतिरिक्त कोणत्याही वाढीव मोबदल्याची मागणी करण्याचा हक्क व अधिकार राहणार नाही.

१५. विकासक असे घोषीत करतात की, सदर मिळकतीवर विकसीत होणारी विकास योजना ही रियल इस्टेट (रेग्युलेशन एण्ड डेव्हलपमेंट) एक्ट २०१६ (RERA) व त्याअंतर्गत असलेल्या MAHARERA नियमावली २०१७ च्या तरतूदींप्रमाणे विकसीत करण्यात येईल. मिळकत मालक ह्याद्वारे असे घोषीत करतात की, त्यांना प्रस्तूत करारात वर नमूद केल्याप्रमाणे मोबदल्यापोटी मिळावयाच्या निवासी बांधकामाबाबत मिळकत मालक MAHARERA नियमावली २०१७ च्या तरतूदींनुसार विकासक यांना संपूर्ण सहकार्य करतील व त्यात कोणत्याही प्रकारे कसूर किंवा टाळाटाळ करणार नाहीत.

१६. उभय पक्षकारांमध्ये असेही ठरले आहे की, विकासक यांनी सदर मिळकतीवरील नियोजीत इमारतीमधील मिळकत मालक यांना देय असलेले बांधकाम वगळता इतर सर्व निवासी व वाणिज्य युनिट्स बॅंकेकडे गहाण ठेऊन बांधकाम कर्ज काढावयाचे असल्यास तसा अधिकार विकासक यांना राहील, मात्र विकासक यांनी असे कर्ज हे स्वत:च्या जोखमीवर घ्यावयाचे व त्याची परतफेड करावयाची आहे, व त्याची मिळकत मालक यांना कोणत्याही प्रकारे तोषीस लागू द्यायची नाही.

१७. सदर मिळकतीवर बांधण्यात येणा-या नियोजीत इमारतीमधील मिळकत मालक यांना मोबदल्यापोटी देय असलेले बांधकाम वगळता इतर सर्व निवासी आणि/अथवा वाणिज्य युनिट्स स्वत:च्या अधिकारात इच्छुक खरेदीदारांना मालकी तत्त्वावर विकण्याचा संपूर्ण हक्क व अधिकार विकासक यांना आहे. तसेच विकासक यांनी त्याबाबत इच्छुक खरेदीदारांशी योग्यते करारनामे करण्याचे व त्यापोटी मिळावयाची मोबदल्याची रक्कम स्विकारण्याची व ती त्यांच्या

कलन - ४
दस्त क्र. ५००३ /१९
१८/२४

मर्जीनुसार व गरजेनुसार वापरण्याची आहे. तसेच सदर निवासी आणि/अथवा वाणिज्य युनिट्स खरेदीदारांना त्यांचे युनिट्स बँकेकडे गहाण ठेऊन कर्ज घेण्याचे असल्यास त्यांना त्याबाबत संपूर्ण सहकार्य करण्याचा अधिकार विकासक यांना आहे. सदर व्यवहाराशी मिळकत मालक यांचा कोणताही हक्क व हितसंबंध राहणार नाही.

१८. सदर मिळकतीवरील नियोजित इमारतीमधील निवासी व वाणिज्य गाळे इच्छुक खरेदीदारांना विकल्यानंतर विकासक यांनी सदर गाळे धारकांची गृहनिर्माण संस्था स्थापीत करण्याची आहे व तदनंतर विकासक सांगतील तेव्हा मिळकत मालक यांनी सदरच्या गृहनिर्माण संस्थेच्या लाभात सदर मिळकतीचे खरेदीखत (कन्व्हेयन्स) करून देण्याचे व सदरचे खरेदीखत नोंदणीकृत करण्यासाठी दुय्यम निबंधक कार्यालयात हजर राहून ते नोंदणी करून देण्याचे आहे. मिळकत मालक ह्याद्वारे असे मान्य व कबूल करतात की, ते वरीलप्रमाणे वागण्यास विनाकारण विलंब, टाळाटाळ करणार नाही किंवा कोणत्याही प्रकारे हरकत, अडथळा निर्माण करणार नाही. सदर खरेदीखतासंबंधात लागणारे मुद्रांक शुल्क, नोंदणी फी व इतर अनुषंगीक खर्च हे सहकारी गृहनिर्माण संस्थेतील सभासदांस द्यावे लागतील. तसेच मिळकत मालक हे नियोजीत गृहनिर्माण संस्थेचे सभासद या नात्याने त्यांच्या वाट्यास येणारा अंतिम खरेदी खताचा खर्च देतील.

१९. ह्या करारास तसेच तदनुषंगीक इतर करारांबाबत लागणारा सर्व खर्च व लागणारे मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क व इतर खर्च विकासक यांनी करावयाचा आहे, परंतू प्रत्येक पक्षकारांनी आपला वकील, सॉलिसिटर नेमल्यास त्यांची फी स्वतः देण्याची आहे.

THE SEAL OF THE JOINT SUB REGISTRAR KALYAN-4
सह दुय्यम निबंधक कल्याण-४
जि. ठाणे
Dist. Thane